# गांधींच्या अहिंसेने सर्वसामान्याला शक्तिशाली केले

## गांधीवादी विचारवंत निरंजन टकले यांचे प्रतिपादन : शाहू स्मारक येथे व्याख्यान

प्रतिनिधी
कोल्हापूर

महात्मा गांधीजींच्या अहिंसेच्या तत्वाने केवळ इंग्रजांच्या साम्राज्यावरील सूर्य मावळला नाही तर आपल्या देशातील सर्वसामान्य माणसालाही शक्तीशाली बनवले, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार आणि गांधीवादी विचारवंत निरंजन टकले यांनी केले.



**कोल्हापूर : व्याख्यानात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत निरंजन टकले. सोबत मिलिंद पाटील, प्रा. टी. के. सरगर, डॉ. भारती पाटील.**

शिवाजी विद्यापीठातील गांधी अध्यासन केंद्र व मोहनदास करमचंद गांधी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त शाहू स्मारकमध्ये व्याख्यानाचे आयोजन केले होते. व्याख्यानात 'महात्मा गांधीजी–समज आणि गैरसमज' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी गांधी अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील होत्या.

निरंजन टकले यांनी गांधींविषयी पसरविण्यात आलेल्या गैरसमजाविषयी विविध दाखले देत विवेचन केले. ते म्हणाले, गांधीजींच्या अहिंसेचे काही शक्ती नपुंसक अशी हेटाळणी करतात. पण याच अहिंसेने जगावर राज्य असणाऱ्या इंग्रजांच्या सत्तेला आव्हान दिले, हतबल केले. भगतसिंगांची फाशी टाळण्यासाठी त्यावेळी गांधीजी आणि तत्कालिन काँग्रेस चळवळीने अरुणा असफ अली यांचे पती असफ अली आणि इतर बडे वकील बचावासाठी दिले होते. स्वातंत्र्यानंतर दंगे सुरू झाल्यानंतर ते थांबण्यासाठी गांधीजी उपोषणाला बसले. १९१६ मध्ये लखनऊ करारावेळी मुस्लिमांना तीन मताचा अधिकार देण्यास सांगणाऱ्यांचा मात्र उल्लेख केला जात नाही असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले, समान न्यायाच्या तत्वावर देशातील प्रत्येकाला एकाच मताचा अधिकार असला पाहिजे याचा पुरस्कार गांधीजींनी केला होता. गांधीजी देशाच्या फाळणीला जबाबदार होते, पाकिस्तानला त्यांच्यामुळेच ५५ कोटी द्यावे लागले, असा गैरसमज पसरविला जातो. पण तो खोटा आहे. फाळणीला गांधीजींचा विरोध होता. ज्यावेळी फाळणी झाली तेंव्हा त्यांवर काँग्रेससह हिंदूत्ववादी पक्षांच्या नेत्यांच्याही स्वाक्षऱ्या होत्या, पण या गोष्टी सांगितल्या जात नाहीत. नेहरू–पटेल वाद असल्याचे भासवून गांधीजींनाही बदनाम केले जात आहे असे त्यांनी सांगितले.

अध्यक्ष प्रा. टी. के. सरगर यांनी प्रास्ताविक केले. मिलिंद पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. स्नेहा मांगुरकर व सरदार जाधव यांनी सुत्रसंचालन केले. प्रभाकर पाटील यांनी आभार मानले.

### निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त आयोजित निबंध स्पर्धेतील प्रथम क्रमांक सौरभ पाटील, द्वितीय मोहन पाटील, तृतीय कुबेर दिंडे, उत्तेजनार्थ ऋतुजा देसाई, संध्याराणी आमटे यांना बक्षिस देवून गौरवण्यात आले.

# ‘आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया’ विविध भाषांत अनुवादित व्हावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा सत्कार

कोल्हापूर : प्रतिनिधी


‘आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया’ या पुस्तकाचा अनुवाद विविध प्रादेशिक भाषांत होऊन सर्वच भाषांतील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ व्हावा, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या ‘आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया’ या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा सन २०१९ साठी उत्कृष्ट विज्ञान ग्रंथ म्हणून महात्मा जोतिराव फुले पुरस्कार जाहीर झाला. त्यानिमित्त डॉ. शिंदे यांचा शिवाजी विद्यापीठातर्फे गौरव करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विज्ञान लेखन करत असताना त्यामधील वस्तुनिष्ठतेला कोणताही धक्का न लावता अत्यंत ओघवत्या गोष्टीरूप पद्धतीने समजावून सांगण्याची शैली डॉ. शिंदे यांना साधली आहे. त्यामुळे वाचकाला ते आपल्याशेजारी बसून सांगताहेत की काय, असा भास निर्माण होतो. त्यामुळे अवघड विषय समजावून घेणे सोपे जातेच, शिवाय ते कायमस्वरूपी लक्षात राहते.

प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, डॉ. शिंदे यांच्यात विद्यार्थी दशेपासूनच सातत्याने काहीतरी वेगळे करत राहण्याची ऊर्मी आहे.

डॉ. शिंदे म्हणाले, वाचन आणि लेखनाच्या प्रेरणा माझ्यात जागृत करण्याचे काम माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले. तेव्हापासून विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून माझ्या प्रत्येक पुस्तकाचे लेखन केले. या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा महात्मा फुले यांच्या नावे देण्यात येणारा पुरस्कार लाभला, ही माझ्यासाठी अत्यंत समाधानाची व जबाबदारीची जाणीव करून देणारी बाब आहे.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, ग्रंथ, विद्यापीठाचे सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन डॉ. शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्येष्ठ कवी संजय कृष्णाजी पाटील, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भारती पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



कोल्हापूर : महात्मा फुले साहित्य पुरस्कार मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठातर्फे उपकुलसचिव व विज्ञान लेखक डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, गजानन पळसे.

# ‘मोहनदास ते महात्मा’ जीवनप्रवास जगाला मार्गदर्शक

## डॉ. चंद्रकांत लेंगरे



**कुरुंदवाड : कार्यक्रमात बोलताना डॉ. चंद्रकांत लेंगरे.**

**कुरुंदवाड : प्रतिनिधी**

मोहनदास ते महात्मा हा राष्ट्रपिता महात्मा गांधींचा दक्षिण आफ्रिकेपासून सुरू झालेला खडतर जीवनप्रवास जगभरातील अनेक विचारवंतांना, अहिंसात्मक मार्गाने आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रेरक व मार्गदर्शक आहे, तसाच तो प्रत्येक साम्राज्यवादी, सत्ताधीशांना, हुकूमशहांना इशारा देणारा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील इंग्रजीचे सहयोगी प्रा. डॉ. चंद्रकांत लेंगरे यांनी केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी १५० वी जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित समारोप समारंभात ‘दक्षिण आफ्रिकेतील महात्मा गांधींचे ऐतिहासिक कार्य’ या विषयावर ते बोलत होते. साने गुरुजी विद्यालयातील साथी सुरेंद्र आलासे सभागृहात औपचारिक सांगता समारंभाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष दादासो पाटील होते. साने गुरुजी शिक्षण संस्थेच्या संचालिका जयश्री थोरात, एस. के. पाटील महाविद्यालयाचे डॉ. दीपक सूर्यवंशी, राजेश मडिवाळ, शरद आलासे, राजेंद्र देसाई उपस्थित होते.

डॉ. चंद्रकांत लेंगरे म्हणाले, भारतातील महात्मा गांधी यांच्या कौटुंबिक, सामाजिक, राजकीय जीवनातील छोटे-मोठे संघर्षपूर्ण प्रसंग, अपमानास्पद प्रसंग यांचा अभ्यास किंवा वाचन आवश्यक आहे. हीच त्यांच्या महात्मा या पदाकडे जाणारी खरी सुरुवात होती. या प्रत्येक प्रसंगातून एक नवा, आदर्शवादी, खंबीर धीरोदात्त, मनोबलाला प्राधान्य देऊन स्वतःला घडवणारा व समस्यांना लीलया भिडणारा हा महात्मा समजावून घेणे हे एक फार मोठे वैचारिक आव्हान आहे. ती काळाची गरजही आहे.

कार्यक्रमाची सुरुवात धनश्री पोवार यांच्या गांधी भजनाने झाली. स्वागत व प्रास्ताविक समिती समन्वयक प्रा. दिलीप सुतार यांनी केले. पाहुण्यांचा परिचय मुख्याध्यापिका रोहिणी निर्मळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन सच्चिदानंद आवटी यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या सत्कारप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.

# 'मूलद्रव्यांची दुनिया' विविध भाषांत अनुवादित व्हावे

## कुलगुरू डॉ. शिर्के; डॉ. शिंदे यांचा विद्यापीठातर्फे गौरव

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : 'आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया' पुस्तकाचा अनुवाद विविध प्रादेशिक भाषांत होऊन सर्वच भाषांतील विद्यार्थ्यांना लाभ व्हावा,'' अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या 'आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया' पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट विज्ञान ग्रंथ म्हणून महात्मा जोतिराव फुले पुरस्कार जाहीर झाला. यानिमित्त डॉ. शिंदे यांचा शिवाजी विद्यापीठातर्फे गौरव केला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''विज्ञान लेखन करीत असताना त्यामधील वस्तुनिष्ठतेला कोणताही धक्का न लावता अत्यंत ओघवत्या गोष्टीरूप पद्धतीने समजावून सांगण्याची शैली डॉ. शिंदे यांना साधली.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''डॉ. शिंदे यांची लेखन, निवेदन शैली रंजक असून वाचकांना खिळवून ठेवण्याची ताकद त्यांच्या लेखनात आहे.'' डॉ. शिंदे म्हणाले, ''वाचन आणि लेखनाच्या प्रेरणा माझ्यात जागृत करण्याचे काम माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले. तेव्हापासून विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून माझ्या प्रत्येक पुस्तकाचे लेखन केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, ग्रंथ, विद्यापीठाचे सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन डॉ. शिंदे यांचा सत्कार केला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, डॉ. नमिता खोत, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, संजय पाटील, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते.

### डॉ. शिंदे यांचा लेखन प्रवास

डॉ. शिंदे यांनी 'एककांचे मानकरी', 'असे घडले भारतीय शास्त्रज्ञ', 'हिरव्या बोटांचे किमयागार' आणि 'आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया' ही पुस्तके लिहिली आहेत. 'क्रायोजेनिक्स अँड इट्स ॲप्लिकेशन्स' या पुस्तकाचे सहसंपादन तर 'सक्सेस गाईड फॉर एमएचसीईटी' पुस्तकाचे सहलेखन केले आहे.

# कमी वेळात सोप्या पद्धतीने औषधनिर्मिती

## डॉ. सविता धोंगडे-देसाई यांचे संशोधन; केवळ सात ते आठ मिनिटांत प्रक्रिया

**आम्ही कोल्हापुरी**

**नंदिनी नरेवाडी-पाटोळे :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : विविध आजारांवरील परिणामकारक औषधांची निर्मिती करताना अनेकवेळा औषध निर्मात्यांना तब्बल ७० ते ८० तासांहून अधिक काळ प्रक्रिया करावी लागते. ही प्रक्रिया वेळखाऊ तसेच किचकटही असते. याला पर्याय शोधत कोल्हापूरच्या डॉ. सविता धोंगडे-देसाई यांनी कमी वेळात सोप्या पद्धतीने औषधनिर्मिती-बाबत संशोधन केले आहे. मायक्रोवेव्ह ओव्हनचा वापर करून त्यांनी संशोधन केलेली प्रक्रिया केवळ सात ते आठ मिनिटांत होते. ही अभिक्रिया कमी वेळात होण्यासाठी त्यांनी नॅनो कॅटेलिस्ट व आयोनिय लिक्विडचा वापर केला आहे. त्यांच्या या संशोधनामुळे क्षयरोग, कर्करोग, रक्ताच्या गुठळ्या होणे या व इतर आजारांच्या औषधनिर्मितीची प्रक्रिया सोपी झाली आहे.



**डॉ. सविता धोंगडे-देसाई**

डॉ. धोंगडे-देसाई यांनी केलेल्या या संशोधनाबाबत जर्मनीतील बर्लिन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत मुख्य व्याख्यात्या म्हणून आमंत्रित केले होते. त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाचे दोन प्रकल्प पूर्ण केले आहेत. त्यासोबतच औषधनिर्मितीच्या सोप्या प्रक्रियेबाबत त्यांच्या व त्यांच्या विद्यार्थ्यांच्या संशोधनावर आधारित १४ आंतरराष्ट्रीय पुस्तके लॅबर्ड अॅकॅडमी, जर्मनी या नामांकित संस्थेकडून प्रकाशित केली आहेत. डॉ. धोंगडे-देसाई मूळच्या साताराच्या आहेत तर त्यांचे सासर पाचगाव आहे. त्यांचे पदव्युत्तर शिक्षण शिवाजी विद्यापीठातून प्रथम क्रमाकांने रसायनशास्त्र विषयात पूर्ण झाले. त्यानंतर त्या देवचंद कॉलेज, निपाणी येथे प्राध्यापिका म्हणून रुजू झाल्या. नोकरी करत असतानाच शिवाजी विद्यापीठात संशोधन सुरू ठेवून पीएच.डी. संपादन केली. त्यांना शिवाजी विद्यापीठाने पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता दिल्यानंतर देवचंद महाविद्यालयात त्यांनी शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त संशोधन प्रयोगशाळा स्थापन केली.

### ३७ शोधनिबंध प्रकाशित

डॉ. धोंगडे-देसाई सध्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा विद्यार्थी पीएच.डी. करत आहेत. त्या दहा वर्षे शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सदस्य होत्या. त्यांचे ३७ शोधनिबंध आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून प्रकाशित झाले आहेत. हे शोधनिबंध त्यांनी आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय परिषदांत सादर केले आहेत.

# अहिंसेचे तत्त्व माणसाला सक्षम करणारे

## ज्येष्ठ गांधीवादी निरंजन टकले; महात्मा गांधींच्या पुण्यतिथीनिमित्त व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३० : 'सत्य, अहिंसा, प्रेम, बंधूता ही चिरंतर भावना आहे. ही मूल्ये गांधींनी आपल्याला दिली आहेत. समोरच्याला निःशस्त्र करण्याचं हसू गांधींकडे होते. सत्य आणि अहिंसेचे सर्वात चांगले प्रतिपालक या स्त्रिया आहेत, असं गांधीजींचे म्हणणे होते. त्यामुळेच भारतीय स्वातंत्र्य लढ्याने महिलांचे सक्षमीकरण केले. सत्याची पूजा ही ईश्वराची सेवा असल्याचा विचार सांगत गांधींनी कर्मकांडाला छेद दिला,' असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व गांधीवादी विचारवंत निरंजन टकले यांनी केले. गांधी विचार मंच व गांधी अध्ययन केंद्र, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधींच्या पुण्यतिथीनिमित्त शाहू स्मारक भवन येथे आयोजित महात्मा गांधी- समज आणि गैरसमज, या विषयावर व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते.



**कोल्हापूर : महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त व्याख्यानात बोलताना जेष्ठ पत्रकार आणि गांधीवादी विचारवंत निरंजन टकले. शेजारी प्रभाकर पाटील, भारती पाटील, टी. के. सरगर, मिलिंद पाटील आदी.**

निरंजन टकले म्हणाले, "महात्मा गांधी एकमेव व्यक्ती होते, ज्यांनी खूप समजून उमजून विचार व्यक्त केले. जगभर गांधी प्रेरणास्थानी आहेत; पण आपल्याला त्यांच्याबद्दल समज व गैरसमज या विषयावर चर्चा करावी लागते, हे दुर्दैव आहे. गांधींना बदनाम करण्यासाठी पहिल्यापासून यंत्रणा राबवली गेली आहे. फाळणीचे खापर गांधींच्या डोक्यावर फोडण्याचे काम काही लोकांनी केले. गांधीजींचे अहिंसेचे तत्त्व माणसाला नपुंसक नव्हे तर सक्षम करते. भारतात सर्वाधिक अपप्रचार गांधींबद्दल केला गेला आहे जो अजूनही कायम आहे. यामुळे मूळ गांधी विचार संपणार नाही. सत्याचा आग्रह आपण कायम धरायला हवा. सरकारच्या विरोधात बोलणं हा देशद्रोह ठरत नाही. गैरसमज पसरवण्याची विषवल्ली संपायला हवी. अराजकता संपायची असेल गांधी हेच औषध आहे."

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील होत्या. त्या म्हणाल्या, "गांधी समजून घेण्यासाठी नेहमी अपुरे ठरतात. गांधींच्या गैरसमजावरील प्रश्नच युवकांना नेहमी पुढे येत आहेत. मूळ गांधी विचार लोकांपर्यंत पोहोचवण्यातच लोकांच्या मनातील गैरसमज अडथळा आहे."

गांधी विचार मंचचे अध्यक्ष प्रा. टी. के. सरगर, मिलिंद पाटील, डॉ. जे. एफ. पाटील, स्मिता पाटील आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सरदार जाधव, स्नेहा मांगुरकर यांनी केले, तर प्रभाकर पाटील यांनी आभार मानले.

### बक्षीस वितरण

गांधी जयंतीनिमित्त गांधी विचार मंचकडून घेतलेल्या निबंध स्पर्धेतील विजेते सौरभ पाटील, मोहन पाटील, कुबेर दांडे, ऋतुजा देसाई, संध्याराणी आमटे यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

# महात्मा गांधींची मूल्ये चिरंतन काळ टिकणार

## निरंजन टकले; पुण्यतिथीनिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महापुरुषांबद्दल गैरसमज पसरविणाऱ्याविषवल्लीकापण्यासाठी आहिंसेच्या मार्गाने जावे लागेल. सत्य, आहिंसा, मानवतावाद, समता, बंधुता हीच महात्मा गांधी यांची मूल्ये चिरंतन काळ टिकणार आहेत, असे प्रतिपादन गांधीवादी विचारवंत निरंजन टकले यांनी केले. मोहनदास गांधी विचारमंच, शिवाजी विद्यापीठ गांधी अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'महात्मा गांधीजी - समज गैरसमज' या विषयावर व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. भारती पाटील होत्या.

टकले म्हणाले, जगातील अनेक देशात महात्मा गांधी यांचे पुतळे आहेत. अनेक भाषांमध्ये त्यांचे साहित्य आहे.



निरंजन टकले

अनेक देशांचे नेते त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन मोठे झाल्याचे सांगतात, तरीही भारतात सर्वात जास्त गैरसमज महात्मा गांधी यांच्याबद्दल पसरविले गेले आहेत. जगात द्वेष, घृणा पसरविणाऱ्यांवर बोलत राहिले पाहिजे. त्यांना सत्याचे पुरावे द्यावे लागतील, तरच पुढच्या पिढीस निर्भय वातावरण मिळेल.

प्रा. टी. के. सरगर यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. मिलिंद पाटील यांनी करून दिला. याप्रसंगी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील विजेते सौरभ पाटील, प्रथम पाटील, कुबेर दिंडे, ऋतुजा देसाई, संध्याराणी आमटे यांना गौरविण्यात आले.

# अहिंसेवर आधारित मानवतावादी विचारांची कास धरणे आवश्यक

## निरंजन टकले; न्यू कॉलेजमध्ये व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अस्थिर, अशांत जगात आज शांतीची गरज आहे. उद्याही गरज राहणार आहे. प्रेम सहकार्य आणि अहिंसेवर आधारित मानवतावादी विचारांची कास धरणे आवश्यक आहे. युवकांनी मानवतावादी विचारांची कास धरून जीवनाची बांधणी करणे हाच खरा गांधीवाद आहे, असे प्रतिपादन गांधीवादी विचारवंत निरंजन टकले यांनी केले.



**कोल्हापूर : 'युवकांसाठी गांधीजी' या विषयावर बोलताना निरंजन टकले. (छाया : नाज ट्रेनर)**

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या न्यू कॉलेज सुवर्ण महोत्सव, महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित 'युवकांसाठी गांधीजी' या विषयावरील व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते.

टकले म्हणाले, द्वेष, मत्सर, हिंसा जातीयवाद, हीनभाव कधीच उपयोगी ठरत नाही तर शांतता प्रेम परस्पर सहकार्य आणि अहिंसावाद हीच तत्त्वे माणसाला कायमस्वरूपी मदतगार ठरली आहेत. मानवतावादी विचार हाच खरा जगण्याचा मार्ग आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना डी. जे. किल्लेदार म्हणाले, महात्मा गांधींचे विचार काल, आजही उपयुक्त आहेत व भविष्यात उपयुक्त राहणार आहेत. त्यामुळे कॉलेज शिक्षण घेत असताना गांधी विचारांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य प्रा. टी. के. सरगर यांनी करून दिला. उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी आभार मानले.



कोल्हापूर : महाराष्ट्र शासनाचा महात्मा फुले साहित्य पुरस्कार मिळाल्याबद्दल उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. डॉ. विलास नांदवडेकर.

# 'मूलद्रव्यांची दुनिया' पुस्तक विविध भाषांत अनुवादित व्हावे : कुलगुरू

## साहित्य पुरस्काराबद्दल डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा गौरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया' या पुस्तकाचा अनुवाद विविध प्रादेशिक भाषांत होऊन सर्वच भाषांतील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ व्हावा, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या 'आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा २०१९ साठी उत्कृष्ट विज्ञान ग्रंथ म्हणून महात्मा जोतिराव फुले पुरस्कार जाहीर झाला. त्यानिमित्त डॉ. शिंदे यांचा शिवाजी विद्यापीठातर्फे गौरव करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विज्ञान लेखन करीत असताना त्यामधील वस्तुनिष्ठतेला कोणताही धक्का न लावता ओघवत्या गोष्टीरूप पद्धतीने समजावून सांगण्याची शैली डॉ. शिंदे यांना साधली आहे.


प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, डॉ. शिंदे यांची लेखन व निवेदन शैली रंजक असून वाचकांना खिळवून ठेवण्याची ताकद त्यांच्या लेखनात आहे. सत्काराला उत्तरादाखल बोलताना डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून प्रत्येक पुस्तकाचे लेखन केले. महाराष्ट्र शासनाचा महात्मा फुले यांच्या नावे देण्यात येणारा पुरस्कार लाभला, ही समाधान, जबाबदारीची जाणीव करून देणारी बाब आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्येष्ठ कवी संजय कृष्णाजी पाटील, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भारती पाटील उपस्थित होते.

# गांधीजींचे अहिंसेचे विचारच चिरंतर : टकले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : अहिंसा, प्रेम, प्रामाणिकपणा, सत्य, लोकशाही, बंधुभाव, समानता हेच गांधीजींचे विचार पुढील काळात जगभर चिरंतर राहणार असल्याचे प्रतिपादन गांधीवादी विचारवंत, ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले यांनी केले. समज, गैरसमज पसरवणारी विचारांची विषवल्ली लावताना कोणीच विरोध करत नाही. नंतर मोठे रूप धारण केल्यानंतर ओरडले जाते. आता ही विषवल्ली सत्याच्या आणि ज्ञानाच्या कुऱ्हाडीनेच तोडावी लागेल, असेही त्यांनी सांगितले. मोहनदास करमचंद गांधी विचारमंच, गांधी अभ्यास केंद्र शिवाजी विद्यापीठ यांच्यावतीने शनिवारी शाहू स्मारक भवन येथे महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथिनिमित्त 'महात्मा गांधीजी समज आणि गैरसमज' या विषयावरील व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते.

निरंजन टकले म्हणाले, महात्मा गांधीजींच्या विषयी अनेक समज - गैरसमज जाणून बुजून पसरविले गेले. त्यांचा लोकांना द्वेष करावा यासाठीच हा खटाटोप केला जातो. असे असले तरी स्वातंत्र्य लढ्यात महात्मा गांधीजींचे अहिंसेच्या विचाराने लोकांमध्ये बळ निर्माण केले. जगातील सर्वांत मोठ्या असणाऱ्या ब्रिटिशांच्या सैन्याला त्यांनी हतबल केले. देशाला गौरवशील इतिहास असून, त्याकडे गौरवानेच पाहिले पाहिजे. लोकशाही अडचणीत येत असेल, अराजकता पसरू द्यायची नसेल, तर गाधीजींच्या अहिंसेचा स्वीकार करावा लागेल.



## सरकारविरोधात बोलणे म्हणजे देशद्रोह नव्हे

सरकारच्या विरोधात बोलणे म्हणजे देशाच्या विरोधात बोलणे असे होत नाही. पूर्वीच्या सरकारविरोधात बोलूनच सध्याचे सरकार सत्तेवर आले. मग आता सरकारविरोधात बोलले तर देशद्रोह कसा होईल, असे टकले यांनी सांगत भाजपवर निशाणा साधला. समज, गैरसमजाबाबत सतत लोकांना जागे करावे लागेल, असेही ते म्हणाले.